## संचालकांचे मनोगत

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रणाली उपलब्ध करुन देतांना मनस्वी आनंद होत आहे.

शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन आपल्या भवितव्याची स्वप्ने पाहणारी ही पिढी जागतिकीकरणानंतर जन्मली आहे. जागतिकीकरण आणि संगणकीकरणामुळे तंत्रज्ञान झपाट्याने बदलत आहे व मानवी व्यवहारातही मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत. हे बदल आत्मसात करुन भविष्यातील तांत्रिक बदलांना अनुकुल ठरणारी पिढी घडविण्याचे काम प्रशिक्षण संस्थांना करावयाचे आहे. भविष्यातील स्वप्ने साकार होण्यासाठी भविष्यकाळात रोजगार उपयोगी ठरणारे प्रशिक्षण घेणे गरजेचे आहे. सद्य:स्थितीत पारंपारिक शिक्षणाच्या मर्यादा स्पष्ट झाल्या आहेत. त्याचबरोबर तांत्रिक व्यावसायिक शिक्षण महागडे सुध्दा झाले आहे. अशा परिस्थितीत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील विविध व्यवसायांचे कौशल्य शिकविणारे प्रशिक्षण हे रोजगार व स्वयंरोजगारासाठी वरदानच आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणामुळे केवळ देशातच नव्हे तर जगभरात विविध स्वरुपातील तंत्रज्ञानाची मोठ्या प्रमाणात गरज आहे. प्रशिक्षित कुशल मनुष्यबळाचा अभाव सर्वत्र जाणवत आहे. उद्योगक्षेत्रातील मनुष्यबळाची वस्तुस्थिती अशी असताना महाराष्ट्रात प्रत्येक तालुक्यात किमान ०१ शासकीय औ.प्र.संस्था (ITI) सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुसार ३५८ तालुक्यात ४१९ शासकीय औ.प्र.संस्था कार्यरत असून त्यांची एकुण वार्षिक प्रवेश क्षमता जवळपास एक लक्ष आहे. त्यामध्ये आदिवासी भागात आदिवासींसाठी ६१ संस्था, अनुसूचित जाती व नवबौध्दांच्या मुलामुलींसाठी ०४ उच्चस्तर संस्था, अल्पसंख्यांकांसाठी स्वतंत्र ०२ संस्था व ४३ शासकीय औ.प्र.संस्थांमध्ये स्वतंत्र तुकडया, महिलांसाठी १५ तर २८ आदिवासी आश्रमशाळा औ.प्र.संस्था अशा संस्थांचा समावेश आहे. सन २०२२ पासुन नक्षलग्रस्त भागातील युवकांसाठी २ शासकीय औ.प्र.संस्था सुरू करण्यात आल्या आहेत. याच बरोबर राज्यात एकूण ५७४ खाजगी औ.प्र.संस्था कार्यरत असून त्यांच्या उपलब्ध जागा १५४३९२ इतक्या आहेत.

औ.प्र.संस्थांमध्ये एक व दोन वर्षे कालावधीचे विविध व्यवसाय शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत उपलब्ध आहेत. या व्यवसायांचा अभ्यासक्रम हा उद्योगधंद्यातील तज्ञांनी बनविलेला असून अभ्यासक्रम बनविताना कारखान्यात वापरल्या जाणाऱ्या कौशल्यांचा विचार करण्यात आला आहे. प्रशिक्षण कालावधीत कारखान्यांना भेटी देणे, उद्योगधंद्यातील तज्ञांचे व्याख्यान, कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित करणे, प्रशिक्षण संपताच शिकाऊ उमेदवारी, नोकरी मिळवून देण्यासाठी मदत करणे या सारखे उपक्रम राज्यातील सर्वच संस्थांत केले जातात.

युवकास आवश्यक असलेले पायाभूत प्रशिक्षण औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये दिल्यानंतर औद्योगिक आस्थापनेत वापरण्यात येणारी यंत्रसामुग्री व तंत्र यांचे ज्ञान व कौशल्य प्राप्त करुन सर्व दृष्टीने पूर्ण कुशल बनावा यासाठी शिकाऊ उमेदवारी योजना अस्तित्वात आली. शिकाऊ उमेदवारांना केंद्र शासनाने मंजूर केलेल्या दरानुसार प्रशिक्षण कालावधीमध्ये विद्यावेतन मिळते. या योजनेअंतर्गत महाराष्ट्र राज्यातील साधारणत: २५००० औद्योगिक आस्थापनांमध्ये शिकाऊ उमेदवारांच्या एकूण ७०००० जागा स्थित करण्यात आलेल्या आहेत. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमधुन उत्तीर्ण होणाऱ्या उमेदवारांपेक्षा शिकाऊ उमेदवारीसाठी उपलब्ध जागा अधिक असल्याने प्रत्येक उत्तीर्ण उमेदवारास संधी उपलब्ध आहे.

इयत्ता १० वी उत्तीर्ण उमेदवारांनी औ.प्र.संस्थेतून २ वर्षे कालावधीच्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण पूर्ण केल्यावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेल्या २ भाषा विषयांची परीक्षा उत्तीर्ण केल्यास उमेदवारास इयत्ता १२ वी ची समकक्षता देण्यात येणार आहे. तसेच इयत्ता १० वी अनुत्तीर्ण उमेदवारांनी औ.प्र.संस्थेतून २ वर्षे कालावधीच्या व्यवसाय अभ्यासक्रमात प्रशिक्षण पूर्ण केल्यावर महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने निर्धारित केलेल्या २ भाषा विषयांची परीक्षा उत्तीर्ण केल्यास उमेदवारास इयत्ता १० वी ची समकक्षता देण्यात येणार आहे.

राज्यातील विविध नामांकीत औद्योगिक आस्थापनांसोबत संचालनालयाने सामंजस्य करार केलेले आहेत. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून राज्यातील शासकीय औ.प्र. संस्थांतील प्रशिक्षण सुविधांचा दर्जावाढ करणे, प्रशिक्षणार्थ्यांना अल्पमुदतीचे प्रशिक्षण देणे, On the Job Training, रोजगाराच्या संधी, निदेशक प्रशिक्षण कार्यक्रम, अद्ययावत यंत्रसामुग्री व उपकरणे उपलब्ध करुन देणे, इतर आवश्यक सोईसुविधा उपलब्ध करुन देणे यासारख्या बाबी प्रथम प्राधान्याने राबविण्यात येत आहेत.

औ.प्र.संस्थांमधील प्रशिक्षण पूर्ण केल्यावर उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांना पदविका (Diploma) अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या वर्गात थेट प्रवेश दिला जातो. अशा प्रकारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना रोजगार, स्वयंरोजगार, शिकाऊ उमेदवारी योजनेंतर्गत रोजगाराची संधी व उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध आहे.

सन २०१३ मध्ये शासकीय औ.प्र.संस्थेतील प्रवेशप्रक्रीया व सन २०१५ मध्ये खाजगी औ.प्र.संस्थेतील प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे. याचा अनुभव व होणारे फायदे लक्षात घेता राज्यातील सर्वच शासकीय व खाजगी औ.प्र.संस्थांमधील शिल्पकारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत प्रवेशासाठी केंद्रीय ऑनलाईन पद्धत राबविण्यात येत आहे. प्रवेशोच्छुक उमेदवारांनी व पालकांनी माहितीपुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, प्रवेश पध्दती व नियम तसेच प्रमाणित कार्यपद्धती यांचा अभ्यास करुन व सद्सदविवेकबुद्धीने ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावा जेणे करून नंतर अडचणी उद्भवणार नाहीत.

राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था प्रवेश प्रक्रीयेत सहभागी असून सर्व संस्था हे प्रवेश अर्ज स्विकृती केंद्र असतील. अर्ज स्विकृती केंद्रात उमेदवार ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे/ पडताळणी /स्विकृती आणि निश्चिती करु शकतील. उमेदवारांनी व पालकांनी माहिती पुस्तिकेत देण्यात आलेली माहिती, प्रवेश पध्दती व नियमांचा अभ्यास करुनच ऑनलाईन प्रवेश अर्ज सादर करावा. प्रवेश अर्ज निश्चित करण्यासाठी व जागा बहाल केलेल्या औ.प्र. संस्थेत प्रवेश निश्चित करण्यासाठी उमेदवाराने प्रवेश अर्जातील माहिती/ दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक मुळ दस्तऐवज/ कागदपत्रे, कागदपत्रांच्या छायांकीत प्रतींचा (Photocopy) एक संच व तात्पुरत्या प्रवेश अर्जाची छापील प्रत (Print Out) नजिकच्या औ.प्र. संस्थेत पडताळणीसाठी सादर करावेत. प्रवेशासाठी आवश्यक दस्तऐवज/ कागदपत्रांची यादी प्रवेश संकेतस्थळावर Download या मथळ्याखाली तसेच माहिती पुस्तिकेत (प्रपत्र-३) उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. उमेदवाराने एकच अर्ज भरावा. एकापेक्षा जास्त अर्ज भरल्यास त्या उमेदवाराचे सर्व अर्ज रद्द होतील. अशा उमेदवाराची निवड झाल्यास वा चूकीने प्रवेश देण्यात आला असल्यास त्याचा प्रवेश रद्द करण्यात येईल व उमेदवार संपूर्ण प्रवेश प्रक्रीयेतुन बाद होईल.

प्रवेशासंबंधी नियम, आवश्यक दस्तऐवजांची माहिती व प्रवेश कार्यपध्दती या बाबत विस्तृत माहिती समाविष्ट असलेली माहिती पुस्तिका प्रवेश संकेतस्थळ https://admission.dvet.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. राज्यातील जास्तीस जास्त उमेदवारांनी कौशल्य प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा.

आपल्या उज्ज्वल भवितव्यासाठी संचालनालयातर्फे मन:पूर्वक शुभेच्छा !!

-sd-
दिगंबर अंबादास दळवी
संचालक
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य